# १२. वाटाड्या

"काका, काका..." आवाज आला. कोणीतरी त्याला हालवत होतं. स्पर्श कोवळा, नाजूक होता. हाताची बोटंही इवलीशी.

"काका, काकाऽऽ" त्या छोट्या मुलीने त्यांना पुन्हा हाक मारली. तसा तो पटकन तिच्या बाजूला वळला. ती म्हणाली –

"काका, मला किनई खूप भीती वाटते."

"कशाची भीती?" काकांनी विचारले.

"मला रस्त्याची भीती वाटते." मुलगी म्हणाली.

"रस्ता काय वाघ-सिंह आहे – खाऊन टाकायला ?" काका म्हणाले.

"वाघसिंह नाही हो – पण केवढी रहदारी असते रस्त्यावर ! मोटारी, स्कूटर, मधेच शिट्टी वाजवणारा पोलीस. कोणी कुठूनही भर्रकन येतं. मघा तर मी त्या सायकलच्या चाकातच जात होते."

"अरेरे !... पण असं रस्त्याला घाबरून कसं चालेल ? बाहेर तर जावंच लागतं ना?"



"हो ना काका. बाहेर जाताना आई, बाबा असतातच बहुतेक माझ्याबरोबर, तेव्हा मला नाही भीती वाटत रस्त्यांची ! आई किंवा बाबांचं बोट धरलं की भीती गायब. अगदी ऐटीत चालते मी त्यांच्याबरोबर." मुलगी म्हणाली.

‘‘अस्सं. मग आता नाही वाटतं कोणी बरोबर ? तुला शाळेत पोहोचवायला, घरी न्यायला येत नाही कोणी ?’’ काकांनी विचारले.

‘‘येतं ना ! बाबा सकाळी शाळेत पोहोचवतात अन् मग तसेच ऑफिसला जातात. आमचा गडी सखाराम दुपारी येतो न्यायला.’’ मुलगी म्हणाली.

‘‘मग आज नाही आला तो ?’’ काका.

‘‘नाही नाऽऽ ! तो सुट्टीवर आहे आज !’’

‘‘मग तू घरी कशी जाणार ?’’ काकांनी विचारले.

‘‘मला घर माहीत आहे. सखारामबरोबर रोज जाते ना, तेव्हा सगळा रस्ता पाहून ठेवलाय मी. तो बघा, समोरच्या त्या उंच इमारतीवर मोठ्ठा टीव्ही काढलाय ना, तिथून वळायचं. मग मोठ्ठं मैदान लागतं. तिथं एक बेकरी आहे. बेकरीजवळून अगदी सरळ गेलं ना काका, की येतं माझं घर.’’

ती नीट समजावून सांगत होती. त्या धिटुकलीच्या बोलण्याची त्या काकांना गंमत वाटत होती.

‘‘नाव काय बेटा तुझं ?’’ त्यांनी मध्येच विचारले.

‘‘माझं नाव आहे मृणालिनी, पण सगळे मला मिनू म्हणतात. काका, तुम्हीपण मिनूच म्हणा.’’

‘‘बरं, पण काय गं मिनू, आईनं तुला एकटंच यायला सांगितलं ?’’

‘‘नाही हो, एकटं नाही. आमच्या घराजवळ राहणारी सोनल आहे ना, तिच्याबरोबर यायला सांगितलं होतं.’’

‘‘मग सोनल कुठे आहे ?’’

‘‘ऊं ! ती गेली मघाशीच. भारी शिष्ट आहे ती ! ती मला चल म्हणत होती, पण मलाच राग आला. किती टिंगल केली तिनं माझी ? मी म्हटलं, मला नाही यायचं तुझ्याबरोबर. तू जा. मला माहीत आहे माझं घर.’’

‘‘मग काय म्हणाली ती ?’’ – काकांनी विचारले.

‘‘ती म्हणाली जा. रस्त्यात घाबरशील. मग येईल तुझी आई मला विचारायला.’’ मिनू म्हणाली.


‘‘पण तुला तर रस्त्याची भीती वाटते ना ?’’ काका.

‘‘अहो, फक्त रस्ता ओलांडताना जीव घाबरतो. वाटतं, सगळ्या गाड्या आपल्याच अंगावर येत आहेत.’’

ते हसले.

‘‘काका, तुम्ही मदत कराल ? बोट धराल माझं ? – फक्त पलीकडे जाण्यापुरतं. मग जाईन मी माझी. मला माहीत आहे पुढचा रस्ता.’’

मिनू उत्साहाने बोलत होती. तिच्या आवाजात आर्जव होते. काकांची छाती मात्र धडधडू लागली होती.



''चला ना काका !.... प्लीऽऽज !'' मिनू म्हणाली.

मिनूच्या आवाजातल्या आर्जवीपणामुळे काकांना गलबलून आले. काय सांगावे या भोळ्या, लहानग्या जिवाला हे त्यांना समजेना; पण तोपर्यंत तिने काकांचा हात पकडला होता आणि ती त्यांना चलायचा आग्रह करत होती. तिच्या स्पर्शातला भोळा विश्वासच त्या काकांना नवे बळ देत होता.

''हे बघ, रस्ता क्रॉस करताना घाबरायचं मुळीच नाही. आधी झेब्रा क्रॉसिंग कुठे आहे ते बघायचं.'' काका म्हणाले.

''म्हणजे रस्त्यावरचे ते पांढरे पट्टे ना?''

''हो तेच. दाखव बरं कुठं आहेत ?'' डोळ्यांवरचा काळा चश्मा ठीक करत काका म्हणाले.

''हे बघा इकडे आहेत.'' मिनूने ओढतच काकांना झेब्रा क्रॉसिंगजवळ आणले.

''शाबास ! आता पलीकडे जाताना आणखी एक काळजी घ्यायची'', काका सांगत होते. ''दोन्ही बाजूंनी येणारी वाहनं नीट पाहायची. आधी उजवी बाजू पाहायची. मोटार, स्कूटर येत नसेल तर पुढे जायचं. मग अर्ध्या रस्त्यातून दुसऱ्या बाजूनं येणारी वाहनं पाहायची. त्यांच्याकडे नीट लक्ष देत आपलं पाऊल उचलायचं. समजलं ?''

''हो !'' म्हणून मिनूने खुशीत मान डोलावली.

''आणखी एक करायचं.''

''काय ?''

''रस्त्यातून कधीही धावत सुटायचं नाही.''

''समजलं मला. चला ना आता.''

''अंहं. एकदम नाही. आधी नीट बघ उजव्या हाताला आणि मला सांग एखादी गाडी येते का ते !''

''उजव्या हाताला ना ? त्या पहा दोन कार येत आहेत अन् स्कूटर तर भरधावच आहे.''

''मग थांब... आता? गेल्या ना त्या ?''

''हो. आता कोणी नाही इकडे. एक गाडी येते आहे, पण ती खूप दूर आहे.''

''वा ! मग चल तर.''

दोघांनीही अर्धा रस्ता पार केला. मग काकांनी परत तिला असेच प्रश्न विचारले अन् रस्ता मोकळा सापडताच दोघेही पलीकडे आली. पलीकडे येताच मिनूने जोरात टाळ्या वाजवल्या. ती फार खुशीत होती.

''वा ! तुम्ही किती चांगले आहात काका ! किती छान शिकवलं तुम्ही मला ! आता रस्ता क्रॉस करताना मला नाही भीती वाटणार... काका, आता मी जाऊ घरी?''

''जा बेटा. पण नीट जाशील नं ?''

''हो अगदी नीट जाईन. तो बघा टीव्ही काढलाय तिकडे माझं घर आहे. दिसलं ना ?'' मिनू विचारत होती. काकांनी मान उंचावली.

''तिकडे नाही हो. इकडे – या बाजूला.'' हाताला धरून काकांना तिरपे वळवत मिनू म्हणाली.

''आता दिसला ना?''

''हो.'' म्हणून काकांनी खुशीने मान हालवली.

''आता मी जाते हं.''

''जा बेटा, नीट सांभाळून जा.''

''वा ! नीट जायला तर तुम्हीच शिकवलं मला काका. मी सांगते आईला. अच्छा ! ठीक आहे.''

''बाय मिनू.'' काकांनी हात उंचावून हालवला. कितीतरी वेळ ते हात हालवतच होते.

कोणाचा तरी धक्का लागला. काका भानावर आले. डोळ्यांवरचा काळा चश्मा काढला. खिशातल्या रुमालाने एकदा त्यांनी आपले डोळे टिपले. मग समोरून येणाऱ्या माणसाची चाहूल लागली. ते आर्जवाने म्हणाले, ''मला दिसत नाही, पलीकडे पोहोचवता का ?''

समोरच्या माणसाने त्यांचा हात पकडला अन् त्याच्या मागोमाग 'काका' निमूटपणे चालायला लागले.

**– शैलजा काळे**

**शब्दार्थ : इवलीशी** – लहानशी. **आर्जव** – विनंती. **गलबलून येणे** – मन भरून येणे.
**चाहूल लागणे** – कुणीतरी येण्याची जाणीव होणे. **निमूटपणे** – गुपचूप, काहीही न बोलता.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मिनू कशाला घाबरत होती ?

(आ) मिनूला दररोज शाळेत कोण पोहोचवत असे ?

(इ) रस्त्यावरील पांढऱ्या पट्ट्यांना काय म्हणतात ?

(ई) 'मिनूला रस्ता ओलांडायला मदत करणाऱ्या काकांना दिसत नव्हते.' हे पाठातील कोणत्या वाक्यावरून कळते ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) आई किंवा बाबांचं बोट धरलं, की भीती ........... .

(आ) माझं नाव आहे ................. , पण सगळे मला मिनू म्हणतात.

(इ) मिनूच्या आवाजातल्या ................. काकांना गलबलून आले.

(ई) आता रस्ता क्रॉस करताना मला नाही ................. वाटणार.

**प्र. ३. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) "मग आज नाही आला तो ?"

(आ) "रस्त्यातून कधीही धावत सुटायचं नाही."

(इ) "तिकडे नाही हो. इकडे, या बाजूला."

**प्र. ४. पाठात आलेल्या इंग्रजी शब्दांना मराठीत काय म्हणतात ते लिहा.**

(अ) प्लीज (आ) क्रॉस (इ) टीव्ही

**प्र. ५. स्वत:ला दिसत नसूनही काकांनी मिनूला रस्ता ओलांडायला कशी मदत केली ते पाच-सहा वाक्यांत लिहा.**

**प्र. ६. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा.**

(अ) काकांनी मिनूला मदत केली, तशी तुम्ही कोणाकोणाला मदत केली ? कशी मदत केली ?

(आ) अंध व्यक्ती, मुले-मुली स्वत:ची कामे स्वतः करतात, म्हणजे ते स्वावलंबी असतात. तसे तुम्ही स्वावलंबी आहात का ?

असल्यास – तुम्ही स्वत:ची कोणकोणती कामे स्वतः करता ?

नसल्यास – स्वावलंबी होण्यासाठी तुम्ही काय काय कराल ?

**प्र. ७. तुम्ही कधी भीतिदायक सिनेमा पाहिला आहे का ? चौथीतल्या जिग्नेशने असा एक सिनेमा पाहिला. तो सिनेमा पाहताना त्याला काय वाटले ते त्याने लिहिले आहे. कंसातील योग्य शब्द वापरून त्याचे लेखन पूर्ण करा.**

(कानाचा, घसा, श्वास, डोळे, कानठळ्या, छाती, जीव, पाय)

सिनेमाच्या सुरुवातीला अगदी शांत रस्त्यावर एक मुलगा चाललेला होता. सगळं इतकं शांत होतं की आपल्या ....... घेण्याचाही आवाज यावा आणि एकदम एक......... बसवणारी किंकाळी ऐकू आली. ...... पडदा फाटतो की काय असं वाटलं. सिनेमात एक भली मोठ्ठी घार उडत आली आणि त्या छोट्या मुलाच्या अगदी जवळून गेली. माझी ......... जास्त जोरात धडधडू लागली. आई–बाबांच्या मधे बसून मी सिनेमा पाहत होतो, पण तरीही .... कोरडा पडला. मध्यंतराआधीचे गुहेतल्या पाठलागाचे दृश्य पाहून तर .... लटलटा कापू लागले. भीतीने ..... पांढरे पडू लागले, पण सिनेमा पाहायचाच होता. हे सगळं पडद्यावर चालतंय, काल्पनिक आहे हे माहिती होतं. तरीही मध्यंतर होईपर्यंत मी ............. मुठीत घेऊन बसलो होतो.

**प्र. ८. खालील प्रसंग तुमच्यावर कधी आले होते का ? त्या वेळी तुम्हांला काय वाटले ? तुम्ही काय केले ?**

(अ) रस्त्यावरून चालताना एखादे वाहन पाठीमागून भर्रकन आले, जवळून गेले.

(आ) रस्ता ओलांडताना एखाद्या अनोळखी माणसाने तुमचा हात पकडला. तुम्हांला त्याच्याबरोबर चालायला सांगितले.

**उपक्रम :**

१. तुमच्या परिसरातील मूकबधिर/अंध शाळेला भेट द्या. माहिती मिळवा. वर्गात सांगा.

२. तुमच्या आईला काम करताना पाहून तुमच्या मनात काय येते, ते वर्गात सांगा.



**वाचा.**

**मावशी** : अरे राजू, मोटारीनं तुला धडक दिली म्हणे.

**राजू** : हो. त्या वेळी मी रस्त्यावरचा फलक वाचत होतो.

**मावशी** : काय लिहिलं होतं त्या फलकावर?

**राजू** : रस्त्यावरचे अपघात टाळण्याचे उपाय !